Movie: Sangate Aika
Year: 1959

Song: Kaal Ratri Sari Majasi
Lyricist: Ga. Di. Madgulkar

काल रात सारी मजसी
झोप नाही आली
जीव झाला थोडा थोडा
ऊर वर खाली
काल रात सारी मजसी
झोप नाही आली
साजणी सखे साजणी
सखे बाई गं
बाई गं सखे बाई गं

पती दूर देशी माझे
रूप माझे मजसी ओझे
पती दूर देशी माझे
रूप माझे मजसी ओझे

मध्यान्हीच्या पारी दारी
एक थाप आली
काल रात सारी मजसी
झोप नाही आली
साजणी सखे साजणी
सखे बाई गं
बाई गं सखे बाई गं

कशी आत घेऊ चोरा
कशी उघडू मी दारा
कशी आत घेऊ चोरा
कशी उघडू मी दारा

पाच माळ्यावरती
माझी कोपऱ्यात खोली
काल रात सारी मजसी
झोप नाही आली
साजणी सखे साजणी
सखे बाई गं
बाई गं सखे बाई गं

कोण आसुसला पापा
पुन्हा पुन्हा मारी थापा
कोण आसुसला पापा
पुन्हा पुन्हा मारी थापा

कलंडले मंचकी मी
मूर्च्छनाच आली
काल रात सारी मजसी
झोप नाही आली
साजणी सखे साजणी
सखे बाई गं
बाई गं सखे बाई गं

आ...

काच कवाडाची होती
पतंगास कळली ना ती
भरारून तो ची होता
येत गं महाली

काल रात सारी मजसी
झोप नाही आली

PlanetRead

Literacy for a Billion

साजणी सखे साजणी
सखे बाई गं
बाई गं सखे बाई गं

काचेवरी त्याची झेप
तीच मला वाटे थाप
काचेवरी त्याची झेप
तीच मला वाटे थाप

अशी तुझी मैत्रीण बाई
पाखरास भ्याली

काल रात सारी मजसी
झोप नाही आली
साजणी सखे साजणी
सखे बाई गं
बाई गं सखे बाई गं

आ...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*